जा.क्र./संगणक/ ४८८७ /२०२०
जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे
दिनांक - १६/१०/२०२०

प्रति,

मा. अध्यक्ष,
सर्व बार असोसिएशन,
पुणे जिल्हा.

विषय - व्हीडीओ कॉन्फरन्सीग यंत्रणेचा व ई-फायलींग सुविधेचा जास्तीत जास्त वापर करणेबाबत...

संदर्भ - १. या कार्यालयाचे परिपत्रक No.B-16(ii)/19/2020, dated 23rd March 2020.
२. या कार्यालयाचे परिपत्रक No.B-16(ii)/24/2020, dated 4th April 2020.
३. या कार्यालयाचे परिपत्रक No.B-16(ii)/30/2020, dated 18th April 2020.
४. या कार्यालयाचे पत्र No.Gen./3259/2020, dated 20th July 2020.

मा. महोदय,

उपरोक्त संदर्भांकीत विषयांस अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, सध्या कोविड-१९, चा प्रादुर्भाव मोठया प्रमाणामध्ये आहे. पुणे जिल्हयातील सर्व न्यायालयांमध्ये व्हीडीओ कॉन्फरन्सींगची सुविधा कार्यरत असून सदरील सुविधेद्वारे वकीलांनी न्यायालयाच्या कामकाजामध्ये भाग घेतल्यास कोविड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यास मदत होईल. आपण पुणे जिल्हयातील सर्व विधिज्ञांना सदरील व्हीडीओ कॉन्फरन्सींगची सुविधेचा वापर न्यायालयीन कामकाजासाठी मोठया प्रमाणात करावा यासाठी प्रोत्साहीत करावे.

तसेच आपणांस असेही कळविण्यात येते की, पुणे जिल्हयातील सर्व आस्थापनांमध्ये ई-फायलींगची सुविधा कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. तसेच सर्व वकीलांमध्ये ई-फायलींग करणेबाबत जागृती करणेसाठी या कार्यालयाकडून एसएमएस पाठविण्यात आलेले आहेत.

त्याशिवाय पुणे जिल्हयातील सर्व आस्थापनांमधील संगणक विभागातील कर्मचा-यांना वकीलांना मदत करणेबाबत सुचित करण्यात आलेले आहे. तरी संबंधीत कर्मचा-यांची मदत घेऊन आपण आपल्या बार असोसिएशनमधील सर्व वकीलांना ई-फायलींगसाठी रजिस्ट्रेशन करणेबाबत प्रोत्साहीत करावे.

आपला विश्वासू

( नीरज प्र. धोटे )
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
पुणे.

/home/ubuntu/Desktop/ROOT-BKP-11062019/District Court_2020.odt